MHOS040009342026

**दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २९३/२०२६**
**विष्णु प्रभाकर ताटे व इतर वि. निरंक**

**निशाणी क्रमांक १ वर आदेश पारीत**

प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ मधील कलम २ अन्वये वारसा दाखला मिळणेसाठी सादर केला आहे.

**अर्जातील कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे :–**

२. अर्जदारांचे असे कथन आहे की, **वासुदेव कृष्णात ताटे** हे **दिनांक १७/०९/२०२४** रोजी मौजे केमवाडी, ता. तुळजापूर, जि. धाराशिव येथे अविवाहीत मयत झाले आहेत. मयत **वासुदेव कृष्णात ताटे** यांचे अर्जदार क्र. १ हे पुतणे व अर्जदार क्र. २ ही पुतणी आहे. मयत **वासुदेव कृष्णात ताटे** यांचे कायमचे राहण्याचे ठिकाण हे मौजे केमवाडी, ता. तुळजापूर, जि. धाराशिव होते. मयत **वासुदेव कृष्णात ताटे** यांचे वडील कृष्णात ताटे व आई काशिबाई कृष्णात ताटे ह्या यापूर्वीच मयत झालेल्या आहेत. तसेच मयत **वासुदेव कृष्णात ताटे यांचा** भाऊ व **काशिबाई कृष्णात ताटे** यांचा मुलगा तर अर्जदार क्र.१ व अर्जदार क्र. २ चे यांचे वडिल **प्रभाकर कृष्णात ताटे** यांचा मृत्यू दिनांक ०५/०४/२०२० रोजी झाला आहे. मयत **वासुदेव कृष्णात ताटे** यांना अर्जदारांशिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारांना **वासुदेव कृष्णात ताटे** यांच्या मृत्यूनंतर ते कायदेशीर

वारस असलेबाबत शासकीय व निमशासकीय कार्यालयात सादर करण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज दिला आहे.

३.	प्रस्तुतचा अर्ज दाखल झाल्यानंतर **दिनांक २८/०४/२०२६** रोजीचे 'दैनिक संघर्ष समाजवादाचा' या वर्तमानपत्रामध्ये नोटीस जाहीर करण्यात आली आहे. सदर वर्तमानपत्राची प्रत (नि.क्र.१०) वर दाखल आहे. अर्जदारांनी मयत **वासुदेव कृष्णात ताटे** यांचे मृत्यू प्रमाणपत्र (नि.क्र.१२) व त्यांच्या आधारकार्डची छायांकित प्रती (नि.क्र.१३ ते १४) वर दाखल केलेले आहेत. तसेच अर्जदारांनी कृष्णा नामा ताटे व प्रभाकर कृष्णात ताटे यांचे मृत्यू प्रमाणपत्र अनुक्रमे (नि.क्र.१९ व २०) वर दाखल केलेले आहे. तसेच

४.	उपरोक्त वर्तमानपत्रामधील जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेकडून अर्जदार हे मयत **वासुदेव कृष्णात ताटे** यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत आक्षेप असलेस जाहीर प्रगटन काढून आक्षेप मागविणेत आले. परंतु, आजतागायत कोणीही आक्षेप घेतलेला नाही.

५.	अर्जदार क्र. १ विष्णु प्रभाकर ताटे, यांनी त्यांचे स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र (नि.क्र.११) वर दिले आहे. अर्जदारांतर्फे साक्षीदार नामे-१. महादेव विश्वनाथ शिंदे यांनी (नि.क्र.१५ ) आणि साक्षीदार नामे-२. आण्णासाहेब दादाराव काशीद यांनी (नि.क्र.१६) अन्वये पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे. तदनंतर अर्जदारांनी प्रकरणात इतर पुरावा देणे नसल्याबाबतची पुरसीस

(नि.क्र.२१) वर दाखल केली आहे. नमुद शपथपत्रात साक्षीदारांनी अर्जदारांव्यतिरिक्त मयत **वासुदेव कृष्णात ताटे** यांचे इतर कोणीही कायदेशीर वारस नसल्याचे नमुद केले आहे. नमुद साक्षीदारांच्या शपथेतील कथने खोटी आढळल्यास त्याबाबत ते शिक्षेस पात्र राहतील.

६. उपरोक्त केलेल्या विवेचनाचा साकल्याने विचार करता अर्जदार हे मयत **वासुदेव कृष्णात ताटे** यांचे कायदेशीर वारस असल्याचे सकृतदर्शनी सिद्ध झाले आहे. त्यामुळे, अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**आ दे श**

१) अर्ज मंजुर करण्यात येतो.

२) अर्जदार **१. विष्णु प्रभाकर ताटे व २. शैला कन्हैय्या वाघमारे** हे मयत **कै. वासुदेव कृष्णात ताटे** यांचे कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

३) अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २ नुसार देण्यात यावे.

MUKKANWAR ANUPAM RAJENDRA

Digitally signed by MUKKANWAR ANUPAM RAJENDRA
Date: 2026.08.04 18:23:45 +0530

**दिनांक :-०४/०८/२०२६.** **(अ.रा. मुक्कनवार)**

**ठिकाण :- तुळजापूर** **३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, तुळजापूर.**

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Anuja j. Patil, Gr. III |
| Court | - | 3rd Jt.CJJD & JMFC Tuljapur |
| Date | - | 04/08/2026 |
| Order signed by the Presiding Officer on | - | 04/08/2026 |
| Order uploaded on | - | 04/08/2026 |